Since March 2002
A National, Registered & Refereed Monthly Journal : **Marathi Literature**
Research Link - 172, Vol - XVII (5), July - 2018, Page No. 62-64
ISSN - 0973-1628 ■ RNI - MPHIN-2002-7041 ■ Impact Factor - 2015 - 2.782

# श्री.दु.आ. तिवारी यांच्या कवितांचा परिचय

*दु.आ. तिवारींची अत्यंत लोकप्रिय पुस्तकं म्हणजे 'मराठयांची संग्रामगीते' आणि 'झाशीची संग्रामदेवता' ही होत. 'मराठयांची संग्रामगीते' या स्तकाची नववी आवृत्ति प्रकाशित झाली आहे. यावरून हे पुस्तक किती लोकप्रिय आहे, याची कल्पना वाचकांना येते. या पुस्तकातील आपल्या पूर्वजांचे पराक्रम वर्तमान पिढीसस्फूर्तिदायक ठरतातच, पण योणाया पिढीस शौर्य व धौर्यचे मार्गदर्शन करणारे आहेत. त्यात एकूण 47 गीतं आहेत. त्या प्रत्येक गीताबद्दल भारतीयांना अभिमान वाटावा, इसकी ती सरस उतरली आहेत. कवी तिवारींनी 'हिन्दुचा हिन्दस्थान' या आपल्या पहिल्या गीतातच देशाबद्दलचा अभिमान व्यक्त केला आहे. आपल्या लोकशाहीप्रधान देशातील एकता, अखंडता, आणि सर्वधर्मसमभाव या जीवनमूल्यांची जोपासना कशी केली जाते, याबद्दल आपले मत प्रकट करतांना कवी म्हणतो....*

**प्रा. जिभाऊ फुला पाटील**

महाराष्ट्र शाहीर दुर्गाप्रसाद आत्माराम तिवारी हे खानदेशातील रहिवाशी होते. त्यांचा जन्म 18-12-1887 रोजी जळगाव जिल्हयातील, जामनेर तालुक्यात 'शेंदुर्णी' या गावी झाला होता. त्यांच्या जन्माबद्दल एक आख्यिका सांगितली जाते की, 'त्यांच्या जन्माच्या आदल्या दिवशी श्री जगदंबेने त्याच्या मातेच्या स्वप्नात दृष्टान्त दिला होता की, तुझ्या पोटी लवकरच पूत्ररत्न येत आहे व माझाच प्रसाद समज. म्हणून कवी तिवारी यांचे नाव दुर्गाप्रसाद ठेवण्यात आले होते।'

पुढे शिक्षणखात्यात नोकरीनिमित्त त्यांनी जळगाव शहरातच कायमचे वास्तव्य केले होते. या वास्तव्यात आपले समकालीन मित्र, काव्यरत्नावलीकार ना. न. फडणीस, कीर्तनकार भैय्यासाहेब गंधे, के.मा. सोनाळकर, कवी माधव ज्युलीयन, डॉ. वि.भि. कोलते, कवी सोपानदेव चौधरी, वगैरे मंडळीत त्यांचा नेहमी सहभाग असे ही साहित्यिक मंडळी, विशेषतः कविता व इतर गद्य साहित्याच्या चर्चेत इतके रंगून जात की, रात्र केव्हा संपून जाई याचे भान त्यांना राहत नसे. मग पहाटेचा कोंबडा आरवला की, सगळे भानावर येत व आजजी चर्चा पुरे म्हणून बैठक विसर्जीत करीत असत. अशा या तालममित वाढलेल्या कवी दुर्गाप्रसाद तिवारींनी एकूण 18 पुस्तके लिहिली आहेत. पैकी 'मराठी कवी विरुद्ध वा. बा. पटवर्धन' हे निबंधात्मक पुस्तक व 'रजपूत वीरांगणा' हा लघुकथासंग्रह सोडले तर बाकी सर्व काव्य व खंडकाव्य आहेत.

कवी तिवारी हे देवीचे अनन्य भक्त होते. या भक्तीपोटीच त्यांनी देवीच्या स्तुतीपर 'चंडिशतक' नावाचे पुस्तक लिहिले आहे. त्यांची भक्तीरसाची दुसरी पुस्तके 'राधामाधव' व 'अभंगमाला' ही आहेत. सहजता हे अभंगाचे मुख्य लक्षण आहे. 'अभंगमाले' तील अबंगांचा आरंभ सहजतेनेच झाला आहे. प्रत्येक अभंग अत्यंत भावपूर्ण, वेधक व रशाळ असल्यामुळे अभंगमाला साहजिकच लोकप्रिय झाली आहे. हे अभंग त्यावेळच्या महाराष्ट्रातील सान्मान्य अशा अभंगांचे साधारणतः तीन भाग पडतात

पहिला भाग परमेश्वरविषयक प्रसन्न भक्तीचा, दुसरा व्यवहारविषयक आणि तिसरा अगदी निराळा आहे.

परमेश्वर भक्तीच्या आरंभी भगवान महाविष्णूचे चित्र आहे. जगाकडे तात्विक दृष्टीने पहाणा-याला बोधाची प्राप्ती होते, असे कवी सुचवितात. या अभंगमालेची माळ परमेश्वराच्या चरणावर अर्पण करताना, कवींनी गुंफलेल्या झेल्यात त्यांच्या काव्यगुणांची परमावधीच झाली आहे.कवी म्हणतो.

*''तुझे एक ध्यान हरपले भान। नादात रंगुन हार केला*
*परिमलहीन सौंदर्यविहीन। माझी ही अर्पण पुष्पमाला*
*तूंच शबरीच्या सेविले बोराला। प्रेमाचा उमाळा ओळखिला*
*नको दोष पाहू दास मा पायाचा। असूं दे खुणेचा माझा झेला''*

या अभंगमालेत भक्ती आणि करुण रसाचा सुंदर मिलाफ झाला आहे. कवी तिवारींना जीवनभर परमेश्वराच्या भक्तीतच एकरूप होऊन, जीवनाचा उद्धार करुन घ्यावा असे वाटते ते म्हणतात,

*''तुझे नाव घ्यावे संसारी रहावे। दुःख हाल जावे विसरोनी*
*तुझे नाव घ्यावे कर्म आचरावे। फलाफल जावे विसरोनी*
*तुझे नाव घ्यावे भक्तीगीत गावे। तालसूर जावे विसरोनी*
*नामाच्या नौकेत झोकोनिया देह। जावे निःसंदेह उद्धरोनी''*

असे या मालेतील अनेक अभंग भक्ती-परमार्थपर आहेत. प्रत्येक अभंगाचा स्वतंत्रपणे व काव्यदृष्टीने विचार केला असता, कवी तिवारींची अभंगरचना हृदयगंम झाली आहे. त्यांच्या अभंगातील सहजता सहज लक्षात येते आणि या सहजतेतच सुंदरता भरली आहे. उदा.-

*''कुसुमाची शोभा दुरुनी पहावी। शरिरी नखही लावूं नये*
*कोलिळाची वाणी दुरोनी ऐकावी। मध्ये कटुवाणी बोलू नये*
*मोराचा पिसारा दुरोनी पहावा। काही अविर्भावा दावू नये*
*नैसर्गिक गुणी गुणमग्न होता। आपण दुष्टता सेवूं नये.''*

कवी तिवारींचे भक्तीपर अभंग रसाळपणामुळे अंतः करणाला भीडतात इतर अभंगात त्यांनी व्यावहारिक अनुभव, निसर्ग निरीक्षण, कल्पना चातुर्य व वाणीचा आवेशही ओतल्यामुळे त्यांची रचना भेदक व वेदक झाली आहे. ते म्हणतात-

*''समुद्राच्या पोटी रत्ने निपजती। शंखही जन्मती त्याच्या पोटी*

*भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ ( जि-जळगाव ) ( महाराष्ट्र )*

*एकस्थानी जन्म एकस्थानी वास। ज्याचे गुण त्यास निवडिती''*

अशी व्यक्तीगणिक संस्कारशिदोरी असून एकमेकांचे गुण-दोष दाखविण्यात कोणताही व्यावहारिक अर्थ नाही है पुढील व्यावहारिक अभंगातून पटवून दिले आहे...

*''आपुलेच नाही स्वच्छ घरदार। परक्याचा केर का काढ़ावा?*
*आपुलिच नाही प्रेममय वाचा। शिव्या परक्याच्या का मोजाव्या*
*आपुल्याच नाही शोधीले चित्तास। बोल परक्यास कां लावावा?*
*अंतदृष्टी आधी तूझी तूच कर। तुवा परभार का वाहावा?''*

दुर्गाप्रसाद तिवारींच्या अभंगात विविध अलंकार आले असून, प्रसाद गुणांची रेलचेल आहे. कित्येक अभंग तर तुकोबांच्या तोडीचेही झाले आहेत. म्हणून आजच्या काळास हे अभंग अत्यंत उपयोगी ठरतील यात शंका नाही. एकेकाळी महाराष्ट्रातील मराठी वीरांची रणांगणावरील भव्य चित्रे रेखून, अंतकरणात कल्लोळ उडवून सोडणारी कवी तिवारींची लेखणी, भक्तीरसातही कशी तल्लीन होते, याचे अभंगमाला हे उत्कृष्ठ उदाहरण होय.

कवी तिवारींचे सुरवातीचे 'काव्यरत्नमाला' व 'काव्यकुसुमांजली'' हे दोन पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. शिवाय 'वनिता' व 'कुमुद्वती' हे स्फुट कवितांचे संग्रहही प्रसिद्ध आहेत.

खंडकाव्यात 'नंदिनी' हे एक उत्कृष्ट सचित्र खंडकाव्य आहे. या खंडकाव्यतायील रम्य कथानक, नायक अचलसिंह व नायिका नंदिनी यांचा स्वभाव परिपोष, निसर्गाचे मनोहर वर्णन आणि युद्धाचे घनघोर प्रसंग वाचून, कवी तिरारींच्या आजवरच्या लौकिकास शोभणारी अशी ही काव्यकृती उतरली आहे.

'नंदिनी' या खंडकाव्याप्रमाणेच 'मनोहरलीला', 'मान्यांची यमुना', 'प्रसन्नराधा', 'महाराणाप्रतापसिंह' इ. सामाजिक आणि ऐतिहासिक अशि सुंदर खंडकाव्य दु.आ. तिवरींनी लिहिली आहेत.

छत्रपति शिवाजी महाराज यांच्या दरबारी एकेकाळी असलेल्या महाकवी 'भूषण' यांनी, शिवाजींच्या जीवनावर मूळ हिंदीत लिहिलेल्या काव्याचे कवी तिवारींनी 'शिवप्रताप' आणि 'शिवराज भूषण' ही दोन पुस्तकं मराठीत भाषांतर करुन लिहिली आहेत. 'शिवराज भूषण' हा अलंकारिक ग्रंथ असून, या ग्रंथात शिवाजी राजाच्या विविध गुणांची मूर्तिमंत चित्रणे वाचाव्यास मिळतात. त्यातील युद्धप्रसंग वाचकास त्या काळात नेतात. तिवारींनी मूळ काव्यातील भावसौंदर्य आणि अलंकार सौन्दर्य यांना बाधा येऊ दिली नाही. पुस्तकात छपाई करतानाही, डाव्या बाजूस हिन्दी मूळ कविता व उजवीकड़े तिचे मिराठीत रुपांतर असे केले आहे. काव्याची भाषा वीररसात्मक असून, तिच्यात अनेक संस्कृत व देशी शब्द आले आहेत.

दु.आ. तिवारींची अत्यंत लोकप्रिय पुस्तकं म्हणजे 'मराठयांची संग्रामगीते' आणि 'झाशीची संग्रामदेवता' ही होत. 'मराठयांची संग्रामगीते' या स्तकाची नववी आवृत्ति प्रकाशित झाली आहे. यावरून हे पुस्तक किती लोकप्रिय आहे, याची कल्पना वाचकांना येते. या पुस्तकातील आपल्या पूर्वजांचे पराक्रम वर्तमान पिढीसस्फूर्तिदायक ठरतातच, पण योणाया पिढीस शौर्य व धौर्यचे मार्गदर्शन करणारे आहेत. त्यात एकूण 47 गीतं आहेत. त्या प्रत्येक गीताबद्दल भारतीयांना अभिमान वाटावा, इसकी ती सरस उतरली आहेत. कवी तिवारींनी 'हिन्दुचा हिन्दस्थान' या आपल्या पहिल्या गीतातच देशाबद्दलचा अभिमान व्यक्त केला आहे. आपल्या लोकशाहीप्रधान देशातील एकता, अखंडता, आणि सर्वधर्मसमभाव या जीवनमूल्यांची जोपासना कशी केली जाते, याबद्दल आपले मत प्रकट करतांना कवी म्हणतो....

ब्राह्मण ब्राह्मणेत्तर वा मुसलमान हिन्दु जैन
पारशी सीख व बौद्ध बहुधर्म श्रद्धावान
आम्ही भारत-भू-पत्र अंतरांत जाणू खूण
बंधू बंधू यांच्या कलही
जरि शिरला कोणी गेही
जसळून बोलू सरोही
पाय काढ गेहातून.. हिंदुचा हिन्दुस्थान

आमच्या या देशाचे शिर विविध पर्वतरांगांनी उंचावलेले आहे. शरीर हे विविध जलवाहिन्यांनी फुलून आलेले आहे. आणि साक्षात रत्नाकर पायाशी लोळण घेत आहेत. अशा या वैभवशाली देशात ज्यांचा जन्म झाला, त्या सर्वांना आपल्या अभिमान आहे.

भारत देशामध्ये विविध महापुरुषांनी जन्म घेतला आहे. त्या महापुरुषांनी देशाच्या शत्रूपढे कधीही आपली मान झुकविली नाही. ज्यांनी देवधर्म नष्ट केले, न्यायनीती सोडली, मानवजातीवर अत्याचार केला आणि आमच्या सिंहासनावर विराजमान झाले अशा शत्रूंसमोर 'लववेना है शिर माते' असे बाल शिवबाने आपल्या मातेला सांगितले होते. शिवबा पुढे म्हणतो... 'रात्री मी एकटाच बसून जन्मभूमिस आठवतो, तिच्या दुःखाने ढसढसा रडतो, त्वेषाने संचारतो, भवानीमाता, भारतमाता मला उठविते, आणि माझ्या हातात समशेरीची मूठ देऊन परकीय सत्तेचा नायनाट करण्याची आज्ञा करते. मग मी...

*मावळेच जमवुन भाई*
*स्थापीन मराठेशाही*
*हालवीन आदिलशाही*
*बोलतो सत्य जे गमते...*

आशा या स्वाभिमानी शिवाजी राजाला सर्मथ रामदासांसारखे गुरु मिळाले आणि दुःखी कष्टी जनतेला धीर आला, म्हणून कवी तिवारी म्हणतात....

''भोसले-कुलोत्तम शिष्य हा ब्राह्मण सद्गुरु होता
तो राजवैभव-संपन्न हा विरक्त साधू होता
ब्रह्म क्षत्रिय तेजाजा हा अपूर्व संगत होता
संकटास ज्या देखोनी
शंकितही होय भवानी
तेथे गर्जे गुरु-वाणी
देशाच्या कल्याणार्थ जय जय रघुवीर समर्थ''

गुरु- शिष्याच्या या संगमाला फिरंगोजी नरसाळा, बीजाप्रभु देशपांडे, मुरारबाजी पुरंदवाला आणि इतर मराठे शूर सरदार लाभल्यामुळे हिंदवी स्वराज्य स्थापन करता आले.

दु.आ. तिवारींनी शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे जसे वर्णन केले आहे. तसेच त्यांच्यातल्या आदर्श राजाचे गुणही वर्णन केले आहेत. आपल्या राज्यातील गोर-गरीब जनतेबद्दल, स्तरीयांबद्दल शिवाजी राजाच्या मनात किती आदर होता, याचा प्रत्यय कल्याणी कल्याणाची या गीतातून येतो. शिवाजी राजांचे कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेबद्दलचे काढलेले गौरोदार तर प्रसिद्ध आहेतच. शिवाय ते आपल्या सैन्यालाही सक्त ताकिद देत असत. त्याबद्दल कवी वर्णन करतात...

*''शत्रूवरी घाला घाले करु नका परस्त्री-छलना*
*जयलक्ष्मी खेचून आणा परि आणु नका पर ललना*

अशा या शौर्यवान, धैर्यवान, नीतीवान, शीलवान, कुलवान राजाबद्दल कवी तिवारी पुढे गौरोदराने

*म्हणतात... ''नीतीमंत शिव-भूपाल गाजला महाराष्ट्रात*
*शीलवंत कुलवंताचे मोहवी मनाला चरित*
*गावोत शिवाची गाणी कवी उत्साहे रसभरीत...''*

पुढच्या गीतात कवींनी मराठी राजगादीच्या इळमळीत स्थितीचे वर्णन केले आहे. 'संताजीची घोडघौड' या गीतात धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांनी केलेल्या पराक्रमाचे वर्णन केले आहे. तसेच 'मोहरा इरेला पडला, कुंभेरीची भंबेरी, गारदी कटोनी मेला, विश्वास सोडूनी गेला, भाऊवर गर्दी झाली' वगैरे गीतातून पेशवाईतील रणधूमाळीचे आणि ती रणधूमाळी गाजविणाया मातब्बर सरदारांच्या शौर्याचे वर्णन केलेले आहे.

तिवारी आपल्या गीतांतून युद्धप्रसंगाचे युद्धप्रसंगा वर्णन इतके हुबे हुबे करतात की, यद्धप्रसंगी रणांगणावर प्रत्यक्ष कवी हजर होते की काय उसे वाचकास वाटते वानगी दाखल पुढील तुकडा पहा...

*कडकडात इतुका झाला की असंख्य विद्युत्पात*
*गोलेही इतुके सुटले जणू तान्यांची बरसात*
*उठला की इतुका धूर जणू जमले घन व्योमात...*

दुःखाचे प्रसंगही अतिशय हृदयद्रावकपणे वर्णन केले आहेत...

*त्वा माझे श्राद्ध करावे मज तुझेच कवणे आले*
*तव हस्त-तिलोदक प्यावे मी तुलाच प्याया दिधले...*

कवीची कल्पकता तर वाचकला अतर्मुख करते... युद्धप्रसंगाचा 'उंच उंच हिमगिरी शिखरे, देखावा पाहत होती...' तर 'मेघांच्या नूतन पंक्ती, कोलाहल ऐकून भीति..' अभी कल्पना चमत्कृतीची उदाहरणे देता येतील.

दु.आ. तिवारींच्या या संग्राहात भारताचा प्राचीनकाल, शिवकाल, पेशवेकाळ आणि इंग्रेजकाल अशा चार प्रवाहांची संग्रामगीते आली आहेत. या चार काळांचा जीवंत इतिहास वर्णन करताना कवी म्हणतात... ''एक काळ ऐसा होता....

*सोन्याचा कोठे धूर? तर भारत खंडामध्ये*
*रत्नाच्या कोठे खाणी तर हिन्दुस्थानामध्ये*
*अमृताच्याची वृष्टी कोठे तर आर्यावर्तामध्ये*
*व 'एक काळ ऐसा होता...*

*रावा पासोनी रंका*
*कोणाला नव्हती शंका*
*शिवबाचा एक डंका*
*चहु दिशेस वाजत होता...*

*तर 'एक काळ ऐसा होता...*

*पांढन्या गजावर बसुनी*
*पेशवे निघाले सजुनी*
*इंद्राची स्वारी म्हणुनी*
*भास हाच व्हावा चित्ता...*

*आणि 'एक काळ ऐसा आला...*

*तो सुधारणा नव आली*
*गेलेल्या वैभव-काली*
*भूरळ ती मनाला घाली*
*तिजलाही भूलली जनता..''*

म्हणून कवी तिवारी शेवटी देशवासियांना आवाहन करतात की...

*''असतील जरी नाना भेद द्या सोडोनी समयाला*
*द्या सोडोनी द्या जातीच्या उच्च नीच या भावाला*
*विसरोनी जा या काळी बंधूंनो गृह कलहाला*

*देशबंधु एकच नाते*
*ठसवा अंतःकरणाते*
*बांधनो कमरा होते*

*एक व्हा निशाणा खाली देशाच्या संकट काळी..*

त्यांच्या या गीत रचनेबद्दल तत्कालीन ग्वाल्हेरच्या शिंदे सरकाने राजदरबारी बोलावून त्यांचा सन्मान केला व मराठ्यांची संग्राम गीते या पुस्तकास देनशे रुपयाचे पारितोषिक दिले होते.

'झाशीची संग्रामदेवता' हे.दु.आ. तिवारींचे दुसरे लोकप्रिय पुस्तक होय. या पुस्तकात महाराणी लक्ष्मीबाई संक्षिप्त चरित्र वर्णन केले आहे. आपल्या झांशी साठी शेवटपर्यंत लढणान्या या शूरमर्दाणीच्या पराक्रमाची, शौर्याची, धाडसाची, कल्पकतेची व स्वाभिमानवृत्तीची ही करुण कहाणी आहे.

'झाशीवर नौबत जडली या गीतात नथेखा आणि राणी लक्ष्मीबाई यांच्यीतालं संग्रामाचे वर्णन केलेले आहे. तर 'आवडती माझी झाशी या गीतात झांशी खालसा झाल्याचे दुःख व्यक्त केले आहे. झशीची राजसत्ता गेल्यामुळे राणी लक्ष्मीबाईना अतिशय दुःख झाले होते. काळाने पुत्र नेला, विधीने मंगळसूत्र तोडले आणि आता राजसत्ता गेली. अशा एका मागोमाग येणान्या संकटांनी राणीला भयंकर वेदना होत होत्या.

मर्दाणी झाशीवाली यागीतात 1857 च्या, सतत 12 दिवस चाललेल्या स्वातंत्र्य संग्रामाचे वर्णन केलेले आहे. इंग्राजांनी झाशीला चोहोबाजूंनी हेरले होते. तात्या टोपेंचा पराभव झाला होता. अशा बिकट सामग्री आपले धैर्य खचू न देता राणी लक्ष्मीबाई शत्रूवर तुटून पडली. त्याचे वर्णन करतांना कवी तिवारी म्हणतात... ''आरक्त उषा ती गमली आरक्त चंडिका गमली

*संतप्त भासली संध्या संप्त भासली काली...''*

शेवटी आपला पराभव होईल म्हूणन, पुत्राला पाठीशी बांधला आणि शत्रूची फळी तोडून निघून गेली. नंतर कविने झाशीच्या बीजनाचे हृदयद्रावक वर्णन केलले आहे.

काल्पीच्या युद्धातही रामी लक्ष्मीबाई ने कल्पांत केला होता. नानासाहेब, तात्याटोपे, बांदेवाले नवाब यांच्याबरोबर राणीने युद्धात यमुनेकडची बाजू सांभाळली होती. परन्तु जेव्हा पराभव जवळ आला तेव्हा, हे सारे पळून जाण्याचा विचार करीत होते. पण राणीने त्यांना धीर दिला व स्वतः आपला घोडा पुढे काढून इंग्रजांच्या तोफखान्यावर भेधक चाल केली. त्या प्रसंगाचे वर्णन करताना कवी म्हणतात..

*''ती धरुन ज्यावर रोख*
*करि समशेरीचि फेक*
*तो सोडी हा भू-लोक..''*

अशा या काल्पीच्या कल्पांतात समयसूचकता दाखवून, राणी लक्ष्मीबाईने ग्वाल्हेरचा किल्ला सर करण्याची युक्ती सुचविली आणि शेटटच्या या युद्धात् प्राणाची आहुती दिली. कवी तिवारी हे श्रीमंत सरदार खासे साहेब यांच्या निमंत्रणावरुन, ग्वाल्हेर येथे गेले होते. ते श्रीमंतांबरोबर मोटारीने जात असता झाशीच्या राणीचा घोडा, ज्या नाल्याजवळ अडला होता, तो नाला त्यांना दाखविण्यात आला होता. त्यावेळी खासे साहेब म्हणाले होते की, 'महाराष्ट्र शाहीर जेथे तमुच्या संग्राम देवतेचा घोडा अडला तो हा नाला.' मग राणीसाहेबांच्या त्या पवित्र स्थळाला कवी तिवारींनी आदराने नमन केले. त्यावेळी त्यांचे अतःकरण गहिवरुन आले होते। अशा या खानदेशातील पहिल्या थोर कविने आपल्या काव्यातून त्तकालीन सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक इतिहासाचा क्रांतिकारी पट उलगडून, आपल्या देशाप्रती असलेली प्रखर देशभक्ती व्यक्त केली होती. ती आधुनिक पिढीलाही निश्चितच प्रेरणादायी ठरेल. म्हणून आधुनिक मराठी साहित्यात दु.आ. तिवारींची कविता संस्मरणीय ठरली आह.

❁❁

A National, Registered & Refereed Monthly Journal : Marathi Literature
Since March 2002
Research Link - 172, Vol - XVII (5), July - 2018, Page No. 65-67
ISSN - 0973-1628 ■ RNI - MPHIN-2002-7041 ■ Impact Factor - 2015 - 2.782

# भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनातील स्त्रीचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन

*भटक्या-विमुक्तांच्या आतमकथनातील स्त्रियांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन वैशिष्ट्येपुर्णतेने दिसून येत असले तरी तिय्चा दैनंदीन जीवनाचा विचार केला तर ती वेगवेगळया समस्याने ग्रासलेली आहे. पुरूषी जोखडाखाली दबलेली व दळली गेलेली भटकी स्त्री आपल्या दुःखाची गाथा कुणापुढेही न मांडता नशिबाला दोष देतु निमुटतेने सहन करत आयुष्याची वाजाबाकी करते. शतकानुशतके मूलभूत सुविधेपासून वंचित राहिलेली भटकी स्त्री सुखासाठी सतत आशावादी आहे.*

**डॉ. शिवानंद गिरी**

भारतात भौगोलिकदृष्टया विविधता दिसून येते. आपल्या देशात धर्म, भाषा जाती, पंथ, वेशभूषा व जीवनमात्रात यात विविधता दिसून येत असली तरी भारतीय समाज सांस्कृतिक धाग्यांनी बांधला गेलेला आहे म्हणूनच भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी 'विविधतेतील एकता' असा समर्पक विचार सांगीतला आहे. भारतीय संस्कतृति ही एक उदार व सर्वव्यापक संस्कृति आहे. संस्कृति ही व्यक्तीजीवनाला दिशा देण्याचे कार्य करीत असते. संस्कृति एका व्यक्तीची नसते तर ती समाजाची असते. या देशात प्रत्येक जातीनुसार माणसाच्या जीवन मरणाची संहिता वेगळ्या स्वरूपाची आहे. ज्याने ज्या जातीत जन्म घेतला त्या जातीतच त्याचा मृत्यु झालेला पाहिजे. अशा स्वरूपाचा अधिनियम या देशातील धर्मशास्त्राने घालून दिलेला आहे. त्यामुळे येथील प्रत्येक जातीतील माणूस आपला सामाजिक बंधनाचा ठेवा सोडून देण्यास तयार नाही. या समाज व्यवस्थेत जन्मावरून माणसाची जातनिहाय विभागणी झालेली आहे. त्यामुळे भारतात अनेक जाती-जमाती पहवयास मिळतात.

भारतीय भूमितील मूळ वसाहतीदार सामाजिक सत्तेपासून आपरले अधिकार गमाबू बसलेले आहेत. सतत भटकंती आणि गुन्हेगारीचा शिक्का मारलेल्या अशा लोकांना कधीही सुख-समृद्धीचे जीवन जगू दिलेले नाही तर त्यांना साधे डोके सुद्धा वर काढू दिलेले नाही, त्यामुळे हा समाज सतत अल3त राहून आपले फिरस्ते जीवन काटत राहिला. पिढयान् पिढया त्यांचना नशिबी सतत उपेक्षाच आली. गावाच्या वेशीच्या आत व वेशीच्या बाहेरही त्यांना स्थान न मिळाल्याने अस्थिर जीवन जगणा-या जाती-जमाती मूळ प्रवाहापासून दूर ठेवण्यात आल्या अशा भटक्या विमुक्त जाती-जमाती म्हणून ओळखल्या जातात. याविषयी रामनाथ चव्हाण म्हणतात, ''ज्यांना वेशीच्या आतत्याही जगात स्थान मिळाले नाही आणि वेशीच्या बाहेरही जे स्थिर होऊ शकले नाही, परन्तु आतल्या आणि बाहेरच्या लोकांच्या आश्रयाने वर्षाषानुवर्षे आपली उपजीविका करीत राहिले तरीही इथल्या जाती व्यवस्थेचे जे अभिभाज्य घटक आहेत. असे 'भटका' व 'विमुक्त' या नावाने ओळखतात.''

आजच्या जागतीकिकरणाच्या युगात कितीही सुधारणा झाल्या असलग्या तरी हा समाज आजही दुःखमय जीवन जगत आहे. आपल्या भटकेपणाच्या प्रवाहात आलेला वेदनापट तो शब्दानेबद्ध करून क्षणभरका होईना आपने दुःख मोकळे करू लागला अन त्यातूनच भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनाचा उदय झाला. भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनातील व्यक्तीजीवनाबरोबर समाजजीवनाच्या जाणिवा चित्रीत होवून समाजदर्शनाबरोबरच संस्कृतीदर्शनही चित्रीत होवू लागले आणि त्यातूनच त्यांच्यातील वेगवेगळ्या परपरेचे दर्शन घडू लागले. भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनात स्त्रियांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा वेध ध्यावयाचा आहे.

'उपरा' या आत्मकथनातील कैकाडी समाजातील स्त्रीला रहायला घर नसल्याने तिला जीवनभर सतत भटकंती करतच आपले आयुष्य काटावे लागते. जीवनात येणा-या प्रत्येक कटू प्रसंगाला ती तोंड देत आपल्या जीवनात एक ना एक दिवस सुखाचा धागा यावा यासाठी ती आशावादी आहे. चार फुटकी भांडी व गाढवावर लादलेला तुटपूंजा संसार हेच तिची संपत्ती असते. कैकाडी समाजात पुरुषी धाक अधिक पहावयास मिळतो. पुरुष सांगले त्या प्रमाणे या समाजातील स्त्रीला वागणे व राहमे निवार्य आहे. म्हणूनच या समाजात स्त्री ही माणूस न ठरहता ती जनावर ठरते. या समाजात पुरुषाला पैशाची गरज पडली तर कर्जाऊ पैसे काढले जातात त्यासाठी तारण वस्तू म्हणून स्त्रीला ठेवले जाते. त्यालाच या समाजात 'सनांग' असे म्हणतात. या ठिकाणी स्त्रीची इच्छा असो नसो की तिचा विचार न घेता तिला निमूटपणे पुरुष सांगेल त्या पद्धतीने व वागवेल त्या रितीने जीवन जगावे लागते याचे वर्णन या आत्मकथनात येते. ''माढी बायको धर्म्याकडे चार वर्स जाती, गहान ठिवलीया. त्यानं पन्नास पन्नास रूपये पाच वेळा दिले. मी चार वर्सात मागारी ददेतू म्हणालू. आता मी पैसे देतूया पर ह्यो माझी बाईल मागारी दीना झालाय.''

यावरून कैकाड़ी सामाजित स्त्री ही उपभोगण्याचे साधन ठरते. या समाजातीत स्त्री ही 'चूल-मूल आणि भोग' या पलिकडे तिचे अस्तित्व शून्य समजले जाते. तिला स्वतंत्र अस्तित्व नाही, तिला जीवन जगताना

*मराठी विभाग, भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर, जिला-लातूर ( महाराष्ट्र )*

स्वातंत्र्य दिसून येत नाही. पोलिस चोरीचा सुगावा घेण्यासाठी म्हणून कैकाडी पालावर येतात तेंव्हाही या समाजातील स्त्री पुरुषांना लपवते व पोलीसांच्या अन्याय व अत्याचारास सामोरे जाते. घरातील पुरुष ठाण्यात जावू नये म्हमून पोलीसाकडे ती विनंती करते. मातीत खेळणा-या मुलाचे लग्न यात्रेत आल्यास लावले जाते. म्हणजेच बालविवाह या समाजात मान्यता आहे. 'आंतरजातीय' विवाह केल्यास समाज त्याला वाळीत टाकतो परंतु जातपंचायत बसूवून 'उरसांड (दत्तक घेणे)' घेऊन पुन्हा त्याचा जातीच्या रिवाजानुसार विवाह लावून जातीत घेतले जाते. या समाजात स्त्रीने दिवस मावळायच्चा आत पालात येणे अनिवार्य समजले जाते ती नाही आली तर तिला पालात घेतले जात नाही.

या समाजातीत स्त्रीही कमालीची अधश्रद्धा बाळगते. गावोगावी भटकंती करत ती आपली उपजिवीका भागवते. या काळात ती जत्रा, चालिरीता, धर्मभोळेपणा व नवससायास करत अंगूरे-धुपारे करत राहते. या समाजातीत स्त्री ही आपले मुले-भाले वर्षभर सुखी समाधानी रहावे म्हणून ती 'आंगणजत्रा' यावरूनच ती किती अशिक्षित व अंधश्रद्धाळू आहे याची प्रचिती दिसून येते.

'गबाळ' या आत्मकथनात दादासाहेब मोरे यांनी 'कुडमुडे जोशी' या समाजातील स्चे जीवन चित्रीत केलेले आहे. या समाजातीत स्त्रीला भीक मागताना तिची होणारी अवहेलना किती निम्न पातळीवरची आहे तरीही ती सहन करतच आपल्या जीवनात सुखाचा क्षण पाहण्याचा प्रयत्न करते. या आत्मकथनात लेखकाची आई स्वतः भीक मागते पण आपल्या मुलाला म्हणजेच लेखक दादासाहेबाला भीक मागू देत नाही. भटकंती करणा-या स्त्रीने चांगले राहू नये तर तिने गचिच्छच रहावे असा परंपरागत समज तिला पाळावा लागतो. स्वतःपेक्षाही आपल्या नव-याला जगणा-या स्त्रिया या समाजात पहावयास मिळतात. या समाजातीत स्त्री कष्टाची कामे करून मुलांना शिक्षण शिकविण्याचा ध्यास घेतात. मानकाआजी वृद्ध असताना व कष्टाची को करून दादासाहेबाला शिक्षण शिकविष्यातच सतत ध्यास घेते या समाजात स्त्रीचे जगणे हे अमानवी पातळीवरचे आहे.

ती जीवनभर भटकंती करत अपमानीत जीवन जगते. या समाजातील स्त्री रूढ़ी, प्रथा, परम्परा व अज्ञानात बुडालेली असल्याने भीक मागून मिळविलेल्या धान्यात ती मरगम्मा देवीच्या जत्रेला जातात. व्रषभर भीक मागून मिळवलेल्या पैशात देवीचा नवस कोंबडे-बकरे फेडण्यासाठी फस्त केला जातो. या समाजातील स्त्री व्रत-वैकल्ये व विधी पार पाडण्यातच आपले आयुष्य खर्ची करते. या समाजातील स्त्रीला मनपसंत नवरा निवडम्याचे स्वातंत्र्य नाही. देवीला देवदासी म्हणून मुली सोडण्याची प्रथा या समाजात पाळली जाते. देवदासी म्हणूना सोडलेल्या या समाजातील स्त्रियांची समस्या तर यापेक्षाही वेगळया पातळीवरची आहे. जीवंतपणाच नरकयातना बोगण्याचा हा काळ म्हमून या देवदासी स्त्रीला ओळखले जाते.

'बेरड' या आत्मकथनात भीमराव गस्ती यांनी 'बेरड' समाजातील स्त्रीच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा वेध घेतलेला आहे. या समाजातील स्त्री आपल्या मुलांना शिक्षण देणे म्हणजे समाजाला पुर्वपरंपरेपासून चालत आलेल्या परंपरेला छेद दिल्यासारखे तिला वाटते. मुलाला शाळेत घातल्यास आपल्या मुलाला मास्तर विनाकारण मारेन हा तिचा गैरसमज आहे. लेखकाची आई याच विचाराची असल्याने ती लखकाच्या शिक्षणाला विरोध करते. एकूलता एक पोरगा मास्तराच्या माराने मरून जाईल असे तिला वाटते.

बेरडाचा जन्म म्हणजे अन्याय-अत्याचार सहन करण्यासाठीच झालेला आहे. पोलिसाकडून होणा-या त्रासाला ती स्वतःलाच दोष देते. पोलिस चोर म्हणून बेरडांच्याच लोकांना पकडण्यास येतात तेंव्हा बेरड लोक जंगलात पळून जातात. एकीकडे या समाजाला घाबरून व नजर चुकबून जीवन जगावे लागते तर दुसरीकड़े द-या खो-यात राहून निसर्गाच्या होणा-या आघातालाही या समाजातील स्त्रीला सामोरे जावे लागते याचे चित्रण गस्ती यांनी या आत्मकथनात केलेली आहे.

> ''त्या जंगलामध्ये एक स्त्री बाळंत झाली,
> जन्मणारं ते चिमुकलं बाळ आपल्या
> जन्माबरोबरच गुन्हेगारीच शिक्का
> पाठीशी घेऊन आलं होतं. किती दुर्भागी
> ती जन्म देणारी माता ! आणि ते चिमुकलं
> बाळ! एकीकडे पोलिसांची भिती तर दुसरीकडे
> कडाक्याच्या थंडीत त्या बाळंतिणीची
> कशी काय व्यवस्था कराचयी याची चिंता!''

या समाजातील स्त्रीचा पती मरण पावला तर तिच्या अंगावरचे सौभ्गायचे अलंकार काढून घेतले जातात व त्या स्त्रीला विधवा घोषीत केले जाते. देवदासीची प्रथा या समाजात पहावयास मिळते. यल्लम्मा देवीला वाहिलेल्या मुलीचे लग्न परशुरामासोबत लावले जाते. बेरड समाजातील स्त्री व सुधारण्याचे कारण म्हणजे ती परंपरागत दृष्टिकोण सोडत नसल्याने जीवनात येणा-या प्रत्येक कटू प्रसंगाचा संबंध ती दैवगतीशी लावते व नशिबाला दोष देत ती आपलं दुःख पचवते.

'उचल्या' या आत्मकथनात लक्ष्मण गायकवाड यांनी पाथरूट समाजातीत स्त्रीला सामाजिक जीवनात हिनत्वाचे जीवन जगावे लागते. पुरूषाबरोबर चोरी करणे हा या समाजातील स्त्रीचा पिढीजात व्यवसाय आहे. कारण चोरीचा अजन्म शिक्का त्यांच्या मथळी मारला गेल्याने त्यांना शेतात कामही कोण देत नाही. पुरूषांनी केलेले शोषण या समाजातील स्त्रिया निमूटपणाने सहन करतात. पुरूषांनी कितीही जुलूम केला तरी त्याला विरोध न करता तो सहन करणे एवढेच तिचे या समाजातील अस्तित्व ठरते. चो-या करून पुरूषांना सांभाळणे व त्यांचे पोलिसापासून संरक्षण करण्याचे काम या समाजातील स्त्रिया करतात. पोलिसाचा सिसेमिरा या समाजातील स्त्रियांना चिकटलेल्या कातडीप्रमाणे दिसून येते.

पोलिस या समाजातीत स्त्रियांनी चोरी केलेली असो अथवा नसो तिला चोरी केल्याची कबुल करण्यासाठी मारतात. जातपंचायत ही या समाजातील स्त्रियांचे शोषण करून त्यांच्यावर अन्याय, अत्याचार करम्याचे भरघोस असे कार्य करते. बहुपत्नीत्व विवाह जसा या समाजात दिसून येतो तसेच बहुपतीत्व विअवाहही केला जातो. रूक्मणीबाई आपल्याला मूल होत नाही म्हणून आपल्या पतीशी सुशीलाला बहिण मानून लग्न लावते व वंशाचा दिवा वाढवते. बलात्कारीत स्त्रियांना या समाजात थारा नाही. स्त्रीला विकण्याचा व्यवसाय केला जातो.

लेखकाचा भाऊ एक बायको असताना दुसरी बायको करतो व दुस-या बायकोला गावातील किसन पाटलाला सोबत घेवून कर्नाटकमध्ये एका शेतक-याला पद्मीण केवळ दोनशे पन्नास रूपयाला विकली जाते. या समाजातील स्त्रिया या हिंदू धर्मातील सस्त्रीप्रमाणेच नवस सायास व व्रत वैकल्ये करतात. या समाजातील स्त्री अंधश्रद्धेची अधिक श्रद्धाळू आहे.

आत्माराम कनीराम राठोड यांच्या 'ताण्डा' या आत्मकथनात बंजारा स्त्रीचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन मोठया खुबीने चितारलेले आहे. तांडयावरील व्यवस्था ही मुलतः नायकप्रधान असल्याने या समाजातील स्त्रियांना सोसावा लागणारा भोगवटा हीन दर्जाचा आहे. म्हणूनूच या समाजातील स्त्री ही हळवी व भावूक स्वभावीची आहे. अशिक्षीत व अंधश्रद्धेने ग्रासलेल्या स्त्रीया समाजात दिसून येतात म्हणूनच उत्तमची आई उत्तमचे डोळे आले म्हणून कोणाच्यातरी सांगण्यावरून उत्तमच्या डोळयात रंग घालते. मुलाचे डोळे रंग गातल्याने गेले म्हणून तिला वेड लागते आणि त्यातच ती मरण पावते.

बंजारा समाज मात्र तिचा मृत्यु भूत लागल्याने झाला असे घोत करतात. सर्व घडणा-या गोष्टी ह्या देवा, धर्माच्या व भूताखेतामुळे घडतात एवढेच शिकवमीचे पाठ या तांड्यावरील स्त्रियांना दिले जातात. त्यामुळे या समाजातील स्त्री अधिकच अंधश्रद्धेच्या खोल गर्तेत फेकली जाते. पोलीसांच्या जाचाबरोबरच पपुढारी व पुजा-याच्या भोंदूगिरीला या समाजातील स्त्रिया बळी पडतात. त्यातच त्यांचे जीवन संपले जाते.

पुनम तांड्यावर सुंदर आहे. परुतु तिला मुल होत नाही म्हणून भोंदूबाबा फसवतो व चिता संसार विस्कटून तिचे जीवन उद्ध्वस्तकरतो. जातपंचायतीचा नायक 'नसाब' या समाजातील स्त्रियांना दोषी ठरवत त्यांचा विनाश करण्यातच अधिक न्यायनिष्ठ मानतो. या समाजातील स्त्री गमेशउत्सव, होळी, दसरा व दिवाळी यासारखे सण तांड्यावर साजरे करते. या समाजातील स्त्री सण उत्सव साजरे करण्याबरोबरच नवस सायासही करते.

'मरणकळा' या आत्मकथनात सौ. आत्मकथनात सौ. जनाबाई गि-हे यांनी 'गोपाळ' समाजाच्या जीवनाबरोबरच स्त्री जीवनाचे चिंतनही केलेले आहे. या समाजात स्त्रीला भोगवस्तू म्हणूनच जीवन जगावे लागते. तिच्यासाठी समाजाने घालून दिलेले नियम व परम्परागत चालत आलेल्या रूढी, प्रथेनेच जीवन काटावे लागते. जातपंचायत सांगले व पुरूष वागवेल त्यानुसारच तिला आपले आयुष्य खर्ची करावे लागते. या समाजातील स्त्रियांनी शिक्षण घेणे म्हणजे पाप करणे किंवा शिंवळकी करणे असे समजले जाते. शिक्षणाने समाजाती प्रगती होत असते असे असले तरी हा समाज शिक्षणाला फारकत घेवून प्रगतीऐवजी हा समाज अधोगतीच अधिक स्वीकारतो.

समाजातील स्त्रियांवर कितीही अन्याय, अत्याचार व जुलूम झाले तरी तिला त्या विरोधात कोठेही दाद मागता येत नाही. या स्त्री विषयक जाणिवा खुद लेखिकेनेचा स्वतः भोगलेल्या असल्याने या आत्मकथानातून येणारी स्त्री अधिक बपोलकी झालेली आहे. लेखिकेला समाजाकडून होणारा शि3णाच्या विरोधातील बहिष्कार, घरच्या दारिद्रियाने शिक्षण घेत असताना करावे लागलेली कष्टतेची कामे, शिक्षण शिकताना अस्पृश्यतेचे कटू अनुभव व लग्नाच्या प्रसंगातून येणारी विषारी वृत्ती या सगळ्याच योचित अनुभवातून हे आत्मकथन अधिक परिणामकारक झालेले आहे. त्यामुळेच हे आत्मकथन केवळगोपाळ समाजाचा दस्ताऐवज रहात नाही तर गोपाळ समाजातील स्त्रियांना जीवन जगताना वाट्याला आलेल्या ससेहोलपटपणा व शोषणपटही साकार झालेला आहे. 'कोल्हाटयाचं पोर' मध्ये किशोर शांताबाई काळे यांनी 'तमासा' सारख्या लोककला प्रकाराला अधिक लोकप्रिय केलेल्या स्त्रियांचे जीवन स्पष्ट केलेले आहे. भटक्या समाजात स्त्री जन्माला येणे हे अशुभ समजले जाते. परंतु 'कोल्हाटी' समाजात मात्र ते शुभ मानले जाते. कारण या समाजातील स्त्री स्वतःच्या भावना व स्वप्न वेशीला टांगून घरातील पुरूषांना पोसण्याचे काम करते. तिचे जीवन म्हणजे पुरूषांच्या मौजी व विलासी जीवनासाठी आपले आयुष्य खर्ची करमे एवढेच असते. पायाल चाळ बांधून पैओशाची नाळ बांधत स्वतःचे शरीर विक्रीला काढणे एवढयासाठीच तिने जगले पाहिजे अशी मानसिक धारणा या समाजात खोलवर रूजलेली आहे.

त्यामुळे या समाजातील स्त्रियांना शिक्षण शिकरणे व स्वतंत्रतेने जगणे याला समाजमान्यता नाही. या समाजातील स्त्रिया सुंदर आहेत त्यांचे अजीवन लग्न केले जात नाहीत. तर त्या मुली नाचण्यासाठी ठेवल्या जातात. लेखकाची आई शांता शिक्षण शिकून शिक्षिका होम्याचे स्वप्न पहाते परंतु ती सुंदर असल्या कारणाने तिचे वडील कोंडिबा तीला नाचरारीन बनवतो असे अनेक कटू अनुभव लेखकांनी या आत्मकथनात उभे केलेले आहेत. 'चिरा उतरणे' या अमानुष प्रथेच्या नावाखाली तर या समाजातील स्त्रियांचा अतोनात छळ केला जातो. 'रासनेला वय दिसत नसते' याचा प्रत्यय यावरून दिसून येतो. चेह-यावर शालीनतेचे विविध भाव पोसणारी स्त्री पुरूषी इच्छेखातर तिला बेआब्रु व्हावे लागते. या समाजातील स्त्री सण, वार व व्रत-वैकल्ये करते, तशीच ती अंधश्रद्धाळू आहे.

'दगडफोडया' या आत्मकथनात रामचंद्र नलावडे यांनी 'वडार' समाजातील स्त्रियांचा सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा वेध घेतलेला आहे. वडार समाजातील स्त्री शिक्षणापासून ती वंचित असल्याने तिच्यात अज्ञान व अविकसितपणा अधिक प्रमाणात दिसून येतो. घरात घडणाया वाईट घटनेला स्त्रीलाच जबाबदार मानले जाते. परम्परागत जीवन पद्धतीत अधिक रममाण होणारी स्त्री या समाजात पहावयास दिसून येत असल्याने ती अंधश्रद्धेला अधिक मानते. प्रत्येक वर्षाला 'सुंकलामा' नाही केला तर आपले मुले मृत्यु पावलील म्हणून ती वर्षभर कमवलेले पैसे यात खर्ची करते.

बालविवाहाची पद्धत या समाजात आहे. जातपंचायत बसवून मुलीच्या लग्नाचा साखरपुडा केला जातो. कर्नाटकातील सौंदनतीला मोठी जत्रा भरली जाते. तेथील यल्लम्मादेवीशी या समाजातील मुलीचे लग्न लाबून तिला जीवनभर तिच्या नावाने गोजवा मागायला लावले जाते. देवदासी म्हणून सोडण्याची प्रथा या समाजात पहालयास मिळते. रूढी, प्रथेने अधिक ग्रासलेल्या या समाजातीय स्त्रिया देवीचा वार म्हमून मंगळवार व शुक्रएवार धरतात. विविध पातळीवर संघर्ष करता जगणा-या या स्त्रिया जातपंचायतीकडून शोषणाच्या बळी ठरतात. पंचाने दिलेला कसलाही निर्णय त्या निमूटपणाने सहन करतात. अन्याय, अत्याचाराच्या विरोधात पंड न पुकारणा-या या स्त्रिया आपल्या सौभाग्याला जीवपाड जपतात.

'बिराड' या आतमकथनात अशोक पवार यांनी 'बेलदार' समाजातील स्त्रियांचे सामाजिक जीवन चित्रीत केलेले आहे. समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान आहे. समाजव्यवस्थेने आखून दिलेल्या रेषांना कुठेच न छेदता आपला संसार त्यांना थाटावा लागतो. पुरूष कितीही व्यसनी असलातरी त्याला देव मानूनच ती जीवन जगते. लेखकाची आई नव-याची जेवण्यासाठी वाटपाहते. परन्तु नवरा रात्री दारूच्या नशेत हुल होऊन येतो. सोबत णलेल्या मटणाची भाजी करायला लावतो व स्वतःच सर्व खातो. लेखाकाची आई जेवावयास बसते तेंव्हा तो तिला मारतो लेखकाची आई मंगळवार असतानाही न जेवताच झोपते. पुरूषी जाच निमूटपणाने सहन करणा-या या समाजातील स्त्रिया प्रामाणिकपणाने जीवन जगणा-या आहेत.

पोलिसी माराला स्वतः समोर जाऊन आपल्या पतीला जीवापाड जपण्याचा प्रयत्न करतात. या समाजातील पुरूष स्त्रियांवर संशय घेवून जातपंचायत बसवतात. रकमीचा दोष नसतानाही तिरा नवरा खेम्या तिला दोषी ठरवून जायपंचायत बसवतो. खेम्या जातपंचांना दारू पाजवतो व रकमीला काडीमोड देण्याचा निर्णय देण्यास लावतो. जातपंचायतीच्या निर्णयानुसार रकमीचे मोहतर परशासोबल लावले जाते. रकमीची इच्छा नसतानाही तिला परशासोबत मोहतर लावून घ्यावे लागते. रकमीला सात नवरे असतानाही तिला परशाला आठवा नवरा मानावा लागतो. आंतरजातीय विवाह या समाजात मान्य नाही. मूल होत नसेल तर पहिले मूल देवीला सोड्ण्याची प्रथा या समाजात आहे. बालविअवाहाची प्रथा या समाजात पहावयास मिळते.

भटक्या-विमुक्तांच्या आतमकथनातील स्त्रियांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन वैशिष्ट्येपुर्णतेने दिसून येत असले तरी तिच्या दैनंदीन जीवनाचा विचार केला तर ती वेगवेगळया समस्याने ग्रासलेली आहे. पुरूषी जोखडाखाली दबलेली व दळली गेलेली भटकी स्त्री आपल्या दुःखाची गाथा कुणापुढेही न मांडता नशिबाला दोष देतु निमुटतेने सहन करत आयुष्याची वाजाबाकी करते. शतकानुशतके मूलभूत सुविधेपासून वंचित राहिलेली भटकी स्त्री सुखासाठी सतत आशावादी आहे.

❁❁

A National, Registered & Refereed Monthly Journal : Marathi Literature
Since March 2002
Research Link - 172, Vol - XVII (5), July - 2018, Page No. 68-69
ISSN - 0973-1628 ■ RNI - MPHIN-2002-7041 ■ Impact Factor - 2015 - 2.782

# जागतिकीकरणामध्ये मराठी संस्कृतीचे संवर्धन

*संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण होत असते. तिचा प्रसार एका समाजामधून दुसऱ्या समाजामध्ये होतो. एका गटाकडून दुसऱ्या गटात असेही संस्कृतीचे प्रसारण होते. एक देश दुसऱ्या देशाची सांस्कृतिक वैशिष्ठे स्वइकारत असतो ज्यावेळी इंग्रजांचे भारतांवर राज्य होते तेंव्हा इंग्रजांची भाषा आणि आचारविचार यांचा भारतीयांनी स्विकार केला. भारतातल्या लोकांनी दुसऱ्या देशात जाणं आणि तिकडच्या लोकांनी इकडे येणं ही खरं तर फार जुनी परंपरा. सांस्कृतिक दृष्टया या पद्धतीनं सगळ जग अगोदरच जोडलं गेलय.*

**प्रा. डॉ.आशा मुंडे**

आज आपण जागतिकीकरण विश्व व्यापार संघ या संबंधीची चर्चा ऐकत आहोत. या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या जोरावरच सगळी धोरणं जगभर राबविली जातात. विकसनशील देशांना यापासून काय मिळणार, गमावणार याचीही चर्चा आपण ऐकतो.

समाज आपल्या परंपरामधून, गरजांमधून स्वतःची संस्कृती घडवित असतो. आपल्या देशाची संस्कृती ही संपन्न आहे. परंतु अर्थव्यवस्थेच्या बाबतीत विचार केला तर शेतीप्रधान अर्थव्यवस्था असलेलया देशातील कार्यसंस्कृती उद्योग प्रधान देशांच्या तुलनेत खूपच सुस्तावलेली, आळसावलेली व क्षमतेचा पर्याप्त वापर न करणारी असते. म्हणून गेल्या कांही वर्षात भाररतासह इतर अनेक राष्ट्रात जागतिकीकरणासंबंधी विचारविनीमय चालू आहे. 1995 साली जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेमध्ये भारत ही सामील आहे. त्यामुळे जागतिकीकरणात भारताचाही समावेश होतो. पर्यायाने या जागतिकीकरणाचे भारतीय उद्योगावर, शिक्षणावर, समाजावर, संस्कृतीवर परिणाम होणे अपरिहार्य आहे.

कांही तज्ञांच्या मते ''खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता, उत्पादन वाढविणे आणि संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करुन त्या बाजारपेठेत जगातील साधनसामुग्रीचे आणि भांडवलाचे सहजतेने परिचलन निर्माण करणे, म्हणजे जागतिकीकरण होय.''

वरील व्याखेवरुन जागतिकीकरणाची नेमकी संकल्पना लक्षात येते. त्यामुळे उद्योगावर चांगला परिणाम होणार आहे. शेतकन्यांच्या मालाला जागतिक बाजारपेठ मिळणार आहे. परंतु फक्त या एकाच क्षेत्रापुरता हा बदल अपेक्षित नाही. तर त्याचा प्रभाव शिक्षण, राजकारण, संस्कृती इ. वर भर पडणार आहे.

जागतिकीकरणाची ही प्रक्रिया आता सुरु झालेली नाही. वास्को-द-गामा इकडे आल्यापासून ही प्रक्रिया सुरु झालेली आहे. अनेक राष्ट्र समुदाय, अनेक देशांच्या संस्कृती जागतिकीकरणाच्या या लाटेत वहात आहेत. जगातल्या सगळया लहानमोठया समाजाला जागतिकीकरणाचा स्पर्श आहे.

जागतिकीकरणाचा सध्याचा अर्थ बाजूला ठेऊन मानवी संस्कृतीशी त्याचा संबंध जोडला तर जागतिकीकरणाला एक परंपरा प्राप्त होते.

मानवी समाजाचे मूलधन म्हणजे संस्कृती होय. मानवी जीवन जगण्याची पद्धती म्हणजे संस्कृती होय. व्यक्तिमित्व विकासाचा मूलभूत पाया म्हणजे संस्कृती होय. जगात जेवढे मानवी समूह आहेत त्या प्रत्येक समूहामध्ये संस्कृतीचे अस्तीत्व असलेले दिसते. म्हणूनच संस्कृती ही माणसाचे अविभाज्य अंग आहे. मानवाप्रमाणे इतर प्राण्यांना ही संस्कृती नसते. सभोवताली असलेल्या पर्यावरणातून आपल्याला जे हवं ते माणसान स्विकारललेलं आहे. कसं जगावं, काय खावं, प्यावं, घालावं, वाहने, उपकरणे, साहित्य, कला यांची निर्मिती माणसाने केली. त्यातूनच मानसाने निर्माण केलेल जग तयार झाले तीच संस्कृती होय.

संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण होत असते. तिचा प्रसार एका समाजामधून दुसऱ्या समाजामध्ये होतो. एका गटाकडून दुसऱ्या गटात असेही संस्कृतीचे प्रसारण होते. एक देश दुसऱ्या देशाची सांस्कृतिक वैशिष्ठे स्वइकारत असतो ज्यावेळी इंग्रजांचे भारतांवर राज्य होते तेंव्हा इंग्रजांची भाषा आणि आचारविचार यांचा भारतीयांनी स्विकार केला.

भारतातल्या लोकांनी दुसऱ्या देशात जाणं आणि तिकडच्या लोकांनी इकडे येणं ही खरं तर फार जुनी परंपरा. सांस्कृतिक दृष्टया या पद्धतीनं सगळ जग अगोदरच जोडलं गेलय. याचं प्रमाण कमी असेल पण जोडलं गेलयं हे खर आहे. रामायण, महाभारतासारख्या महाकाव्यातही असे संदर्भ येतात. यउदा. श्रीलंका वै. अरबी व्यापान्यांच्या टोळया भारतात आल्या. इंग्रज व्यापार करण्यासाठी भारतात आले. मुघल आले. पोतुगीज आले. प्रत्येकांनी आपली कला या देशात रुजवलेली दिसते. इंग्रजांच्या काळात त्यांच्या साहित्य प्रेरणा घेऊन आपल्याकडे साहित्य लिहलं गेलं. मुघलांनी ताजमहालासारखं जगातलं सुंदर शिल्प भारतात उभं केल. या सगळया लोकांच्या संस्कृतीमुळं भारतीय संस्कृती आणखी संपन्न झाली. एकमेकांच्या संस्कृती आदान झाली. एकमेकांच्या संस्कृती आदान-प्रदानातून जगभर मानवी संस्कृती समृद्ध होत गेली आहे. युद्धाचाही संस्कृती संवर्धनात महत्वाचा वाटा आहे. वेगवेगळे रितीरिवाज, भाषा असलेले गट समोरासमोर आल्यावर त्यातूनही बदल झालेले दिसतात. संस्कृतीची देवाणघेवाण झालेली दिसते. आजची मराठी भाषा अनेक समजाच्या भाषेतून समृद्ध झाली आहे. त्यामुळेच मराठीत हिंदी, इंग्रजी, उर्दु, फार्सी इ. भाषेतून आलेले शब्द मराठी भाषेत सहजपणे अगदी मराठी शब्दाप्रमाणेच बोलले जातात.

जागतिकीकरणात असेच संस्कृतीचे संवर्धन होईल असे अपक्षितआहे.

*मराठी विभाग, श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय, लातूर ( ता.जि.-लातूर ) ( महाराष्ट्र )*

आज माणूस असा विचार करतोय की अमेरिकन संस्कृती ही जागतिक संस्कृती होणार असेल तर त्यानुसारच स्वतःचा विकास करुन घेण्यात काय गैर आहे? आणि त्या अनुषंगाने त्याचे आजचे वागणे दिसत आहे. आपली भाषा, संस्कृती याचा ताकदीने वापर करुन हा माणूस उभा राहतोय. आपलं स्वत्व टिकवून, आपल्या संस्कृती आणि इतर संस्कृती यांना एकमेकीत मिसळून तो आपली एक नवीन संस्कृती तयार करतोय आणि ही उदाहरणं आपल्याला नवीन नाहीत. इंग्रजाच राज्य भारतात आल्यावर आपल्या लोकांनी त्यांची भाषा आथ्मसात करुन नोकऱ्या मिळवल्या आणि स्वतःला सुरक्षित केलं आजही या जागतिकीकरणात सहभागी होऊन स्वतःला सुरक्षित केलं आजही या जागतिकीकरणात सहभागी होऊन स्वतःला सुरक्षित करणारे लोक आहेतच. जगभर जिथे संधी मिळेल तिथे हे लोक जाताना दिसतात. ते तेथील भाषा, संस्ती याचं नुसत अनुकरणच करत नाहीत तर ते त्याचा अंगीकार करतात. ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंतचा इतिहास पाहिला तरआपल्या असे लक्षात येते की, एकाही संताच्या काळात मराठी भाषा, मराठी, समाज, मराठी संस्कृती मुक्त नव्हती. सतत परकीय सत्ता असलेली दिसते. तरीही सगळी आक्रमण सगळे प्रभाव पचवत मराठी भाषा टिकली, मराठी संस्कृती टिकली. उलट तिच्यात संवर्धन झाले. तसेच संवर्धन जागतिकीकरणामुळे होईल अशी अपेक्षा आहे.

आज आपण जागतिकीकरणामुळे भाषा, संस्कृती टिकणार नाही असे म्हणत आहोत पण संस्कृती मात्र सगळयांना पोटात घेत असते. सगळे प्रभाव पचवत असते. बाहेरील व्यवस्थांना रूपांतरीत करुन ते आत्मसात करण्याची शक्ती संस्कृतीमध्ये असते. या संदर्भात टिकास्वयंवर, या ग्रंथात डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी फार सुंदर विवेचन केललं आहे. ते म्हणतात ''सकाहित्याच्या परंपरेत ही देशीकारणाची प्रक्रिया अव्याहत चालू असते. प्रत्येक नव्या साहितयिकाला आपली मुळे या परिसरभिमुख परंपरेत खोलवर रोवलेली असल्याचे आपोआप जाणवते. परसंस्कृतीशी संपर्क झालेल्या लोकांच्या जाणिवेत वा नेणिवेत परसंस्कृतीतील नवी नवी मूल्य, तत्वे एवढेच नव्हे तर मोठमोठया सांस्कृतिक व्यवस्था सुद्धा आत्मसात केल्या जातात. हिंदुस्थानात आर्य हुण, शक, मोगल इत्यादींचे असे देशीकरण झाले. उसनवारी करतांना सुद्धा परक्या समाजाचा कितीही तीव्र सांस्कृतिक व राजकीय दबाब असो कोणते मूल्य किंवा तत्व घ्यावे हयाची निवड सांस्कृतिक व्यवस्था अत्यंत काळजीपूर्वक करत असतात. अशाच परक्या गोष्टीला देशी व्यवस्थेत शेवटी स्थान मिळते. येथे संस्कृतीसंपर्काच्या गदारोळात पहिल्या पिढीची चूक झाली तर पुढच्या पिढया त्यात दुरुस्ती करुन समतोल साधताना दिसतात.''

यावरुन आपल्या असे लक्षात येते की, कुणीही आपली संस्कृती सोडून दुसरी संस्कृती स्विकारत नाही. आपली देशी संस्कृती छेदून दुसऱ्या महाव्यवस्तेत जाण्याची आपल्या साहित्याला गरज नाही. म्हणूनच शेक्सपिअर सारख्या लेखकाच्या कलाकृती त्यांच्या मूळ प्रवृत्तीनेच सगळया विश्वावर राज्य करतात. विश्वसाहित्यात मानाचे स्थान प्राप्त करतात. विश्वसाहित्यात गणना होणारे हे ग्रंथ त्यांच्या संस्कृती जपत असतात. पण तरीही जगभर त्या वाचल्या जातात. त्यामुळे साहित्य जर त्या पातळीचं असेल तर त्या साहित्याद्वारे संस्कृती संवर्धनच होईल. जागतिकीकरणामुळे ते साहित्य जगाच्या समोर येईल. म्हणजे पर्यायाने जागतिकीकरण संस्कृती संवर्धनाला हातभार लावेल असे मला वाटते.

महात्मा गांधीचे अध्यात्म आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माचे केलेले पुनरुज्जीवन यामुळे भारतीय संस्कृतीत आधुनिकता आळी आहे. परंपरा आणि आधुनिकता यामधील द्वंद तर निरंतर चालूच असते. किंबहुना ते तसेच चालू राहिले तरच संस्कृती जिवंत राहू शकते.

इंग्रजांचे राज्य आल्याबरोबर भारतीय समाजाने त्यांची पोषाख पद्धती स्विकारली. पण त्यामुळे संस्कृती बदलली असे म्हणता येत नाही. उलट नवीन गोष्टीचा समावेश आपल्या संस्कृतीत झाला. जागतिकीकरणामुळे भाषेच्या, पोषाखाच्या बाबतीत हेच बदल अपेक्षीत आहेत. जागतिकीकरणामुळे भाषेच्या, पोषाखाच्या बाबतीत हेच बदल अपेक्षीत आहेत. जागतिकीकरणामुळे भाषा संस्कृती धोक्यात येईल असे बोलले जाते. परंतु प्रत्येक राष्ट्राने आपली भाषा संस्कृती टिकवण्याचा प्रयत्न केला तर भाषा, संस्कृती टिकणे अवघड नाही. परिवर्तनासह भाषा, संस्कृती टिकवली तर तिचे संर्धन होईल, तिच्यात आणखी चांगल्या मूल्यांची भर पडेल.

माझ्या वरील विवेचनातून जागतिकीकरणामुळे होणाऱ्या संस्कृती संवर्धनाचे स्वरूप कसे असेल है लक्षात येते पण या जागतिकीकरणामुळे संस्कृतीचे संवर्धन होईल पण त्याला मर्यादा पडतील हे खरे आहे. इंग्लंड, अमेरिकेसारख्या देशाची संस्कती सगळया जगात रुजते की काय अशी भिती निर्माण झाली आहे. जागतिकीकरणातून येणाऱ्या तयार ज्ञानामुळं स्वतःचं ज्ञानं असल्याची गरज उरली नाही. अमेरिका इंग्लंड मधील फॅशन्स, सवयी, रितीरिवाज याचे अनुकरण आज प्रत्येक माणूस करतांना दिसत आहे. आपल्याला आपल्या राष्ट्रभाषेची लाज वाटते. मातृभाषेची लाज वाटते. इंग्रजीत चार वाक्यं बोलायला आली तरी त्यात आपण धन्यता मानतो. जागतिकीकरणामुळे येणारं हे संकट फार मोठ आहे. कारण आपली मराठी भाषा, भाषा साहित्य टिकवायच असेल तर आपल्या भाषेवर, संस्कृतीवर आपण प्रेम केल पाहिजे. तरच जागतिकीकरणात भाषा संस्कृती, संवर्धन होईल असं मला वाटतं.

जागतिकीकरणाला आपली संस्कृतीचं थोपवून धरु शकेल. या संदर्भात भालचंद्र नेमाडे यांनी 14 मे, 2002 रोजी श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर येथे दिलेल्या आपल्या व्याख्यानात खालील विचार मांडले आहेत ते म्हणतात, ''ज्या परिस्थितीतून या जागतिकीकरणाला विरोध करायचा आहे. त्या आपापल्या भाषा, संस्कृतीच्या बहुविधतेच्या देशी परंपरा याच्यात बुरसटलेल्या जुनाट देशी परंपरासुद्धा आपण टिकवायच्या का? हा प्रश्न नेहमी विचारला जातो. आता प्रत्येक जिवंत संस्कृतीत बुरसटलेल्या रुढी, प्रघात टाकून देऊन सतत नव्या घेण्याची प्रक्रिया चालू असतेच. आणि कुणालाही असं म्हणता येत नाही की तुम्ही देशी झालात की तुम्ही थांबला, बुरसटला, अस अजिबात नाही. तुम्ही अंतरराष्ट्रीय होऊनसुद्धा बुरसटू शकता आणि देशी होऊनसुद्धा बुरसटू शकता. बुरसटण्याची शक्यता दोन्हीकडे आहे. फक्त टिकवायच काय आणि घालवायच काय अशा युद्धाच्या प्रसंगी आपल्याला काही गोष्टी टिकवणं आवश्यक असतं. गुडीपाडव्याला कडुनिबांची पाला लागतो, ही परंपरा टिकवणं आवश्यक आहे. अंधश्रद्धा असेल काही असेल. त्यांच्यामुळं दारोदार कडुनिंब असणं आवश्यक आहे. आता आपल्या देशात हे ही फारच आहे की लोक टिकवण्याच्या सुद्धा टोकापर्यंत जाऊ शकतात. हजारो वर्षापासूनच्या या परंपरा आहेत आणि या वारसा म्हणून टिकवणं आवश्यक आहे. किल्ले, अजिंठा, वेरुळ, अशोकस्तंभ यासरख्या.

मोठया संस्कृती सुद्धा लहान संस्कृतीमुळेच टिकत असतात. मराठी भाषा सुद्धा तिच्या बोलीमुळे टिकून आहे. मराठी भाषा टिकवून टेवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. आपण जर भाषा, संस्कृति टिकवली तरच जागतिकीकरणात आपला निभाव लागू शकेल है ही तितकेच खरे आहे.

जगातील सर्व ज्ञान जर मराठीत आणायचे ठरवले तर त्यासाठी मराठीचे शब्द सामर्थ्य वाढवावे लागेल. मराठी भाषा समृद्ध होण्यासाठी इतर भाषेतील ज्ञान मराठी भाषेत भाषांतरीत होणे आवश्यक आहे. जागतिकीकरणामुळे महाराष्ट्रीयन संस्कृतीचा प्रसार जगभर होईल. आज आयुर्वेद आणि योगामुळे आपली संस्कृती जगभर पसरली आहे. अमेरिका, इंग्लंड यासारख्या देशात भारतीय पद्धतीचे जेवण लोकप्रिय होत चाललेले आहे. एकंदरीत जागतिकीकरणात मराठी भाषा टिकून राहिल एवढेच नव्हे तर सातासमुद्रापलीकडेही आपला दबदबा निर्माण करेल.

❁❁